


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २७६, शनिवार २० जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# वादग्रस्त पुजा खेडकर प्रकरणात पंकजा मुंडेचा बादरायण संबंध

■ नगर लोकसभा निवडणूकीशी अंगुलीनिर्देश ? ■ कावळा उडायला आणि फांदी तुटण्याचा योगायोग ? ■ नाण्याची दुसरी बाजूही तपासाच

**देशभर प्रचंड गाजत असलेल्या प्रशिक्षणार्थी आय ए एस अधिकारी पुजा खेडकर यांचे प्रकरण वादग्रस्त नव्हे तर धक्कादायक असून भारतीय प्रशासन व्यवस्थेतील सर्वोच्च बेबनावार लख्ख प्रकाशझोत टाकणारे ठरते.**

प्रक्षिक्षणार्थी पुजा खेडकर यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांचे दालन बळकावणे, खाजगी गाडीवर अंबर दिवा लावून फिरणे, शिपायासह स्टाफची अवास्तव मागणीही करणे, प्रशासकीय व्यवस्थेला छेद देणारे ठरते. त्याचे सकृतदर्शनीय समर्थन होऊ शकत नाही. त्यापुढे जाऊन अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळविणे, ओबीसीतून नॉन क्रिमी लेअरच्या आधारे आरक्षण आदी बाबी ठळकपणे पुढे आल्यात. त्यामुळे पुजा खेडकर यांची पुण्यातून तातडीने वाशीमला उचलबांगडी करण्यात आली. आता तर त्यांचा प्रशिक्षण कालावधी संपविण्याचा कालावधी आला असून लालबहादद्दुर शास्त्री नॅशनल ॲडमिनिष्ट्रेशन अकादमी मसुरीत त्यांची चौकशी होईल. हा तपासाचा भाग झाला. त्यावर आताच भाष्य करता येणार नाही. पण प्रशिक्षणार्थी पुजा खेडकर यांनी पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली तोही चौकशीचा भाग ठरू शकतोच. एकूणच हे प्रशासन सेवेतील अत्यंत गंभीर आणि वशीलेबाजीचा कळस गाठणारे प्रकरण ठरते.

याचबरोबर पुजा खेडकर यांची मातोश्री मनोरमा खेडकर पिस्तुलाने धाक दाखवून पुणे जिल्यातील मुळशीतील शेतकऱ्यांना धमकवण्याचे जुने प्रकरण पुढे आणले गेले तसेच त्यांचे वडील आणि नगर लोकसभा मतदार संघातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार दिलीप खेडकर यांची एसीबीने चौकशी लावली आहे. ते २०२ ०ला प्रदुषण नियंत्रण महामंडळाच्या संचालक पदावरून निवृत्त झाले होते. आता त्यांनी जुनी प्रकरणे उकरून काढून ती ऐरणीवर घेतली जात आहेत. खेडकर कुटूंब हे नगर जिल्हयातील पाथर्डी तालुक्यातील भालगांवचे आहे. विशेष म्हणजे मनोरमा खेडकर या अहमदनगर जिल्हयाचे माजी मुख्याधिकारी जगन्नाथ बुधवंत यांची कन्या होत. त्या भालगांवच्या सरपंच होत्या. भालगांवच्या ग्रामस्थांनी या प्रकरणच्या विरोधात आंदोलनाचा इशारा देत मनोरमा खेडकर यांना उत्फूर्त पाठिंबा दर्शविला आहे. तर दिलीप खेडकर यांनी हा राजकीय कट कारस्थानाचा भाग असल्याचा आरोप केला आहे.

पुजा खेडकर यांनी भारतीय प्रशासन सेवेतील सर्वोच्च प्रशिक्षणासाठी कागदपत्रांची जी हेराफेरी केली ती इतक्या सहजासहजी झालेली नसणार. त्यामागे बडया राज्यकर्त्याचा हात असू शकतो हा संशय येणे सहाजिक आहे. तो जसा नाकारता येणार नाही तसेच पुजा खेडकर यांची प्रकरणे एका पाठोपाठ एक अशी पुढे आली ती सुध्दा पुर्वनियोजित कटाच्या प्रकाराचा भाग ठरतो. बडया नेत्याचा भाग असू शकतो. वास्तविक मसुरीतील प्रशिक्षण अकादमीने हे प्रकरण यापूर्वीच उजेडात आणायला हवे होते. त्यांच्या चुकीमुळे पुजा खेडकर यांना पुण्यात प्रशिक्षणार्थी म्हणून नियुक्ती मिळाली. त्यांनी नियुक्ती कालावधीत चुका केल्या नसत्या तर कदाचित यावर कायमस्वरूपी पडदा पडण्याची शक्यता होती. म्हणजे आएएस च्या सर्वच नियुक्त्या योग्य नाहीत यावर शिक्कामोर्तब होते. पुजा खेडकर जात्यात असल्या तरी देशातील अनेक जिल्हाधिकारी सुपात आहेत. या निमित्ताने सर्वांचीच चौकशी झाली पाहिजे. अगदी पुण्याचे जिल्हाधिकारी दिवसे हे सुध्दा अपवाद राहता कामा नये. दिवसे यांच्याविरोधातही काही अधिकऱ्यांनी तक्रारी केल्याचा पुर्वइतिहास असल्याची वंदता आहे. या निमित्ताने सर्वांचीच चौकशी झाली पाहिजे. जिल्हाधिकारी दिवसे यांचा बोलविता धनी कोण आहे यावर प्रकाश झोत पडेल.

मनोरमा खेडकर यांचे शेतकऱ्यांचे प्रकरण जुने असून त्याप्रकरणी त्यांना आता अटक झाली आहे. मग यापूर्वी जिल्हाधिकारी आणि पोलीस यंत्रणेने त्या प्रकरणाचा सोक्षमोक्ष का लावली नव्हता ? आताच हा व्हिडीओ कोण जाणीवपुर्वक व्हायरल करते ? त्यामागचे नेमके प्रयोजन काय ? उशीरा चौकशी करणे उभय बाजूने अन्याय करणारा ठरतो. त्याचे उत्तरदायित्व जिल्हाधिकारी दिवसे आणि पर्यायाने राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांना स्वकारावे लागेल. मंत्री विखे यांचा थेट सबंध जोडण सकृतदर्शनीय संयुक्तीक नसेल तर आ. पंकजा मुंडे यांना उमेदवारी मिळावी या सदिच्छेने मोहटा देवीला दिलीप खेडकर यांनी चांदीचा मुकूट चढविला असेल तर या प्रकरणाशी आ.पंकजा मुंडे यांचा बादराण






## त्या व्हिडिओचे इंगित ?

**लोकसभा निवडणूकीपूर्वी नगर दक्षिणचे तत्कालीन खासदार डॉ. सुजय विखे यांनी राम मंदीर उदघाटन प्रित्यर्थ नगर जिल्हयात साखर-डाळ चे मोफत वाटप केले. त्यावेळी पाथर्डी तालुक्यातील एक व्हिडीओ व्हायरल केला तो प्रचंड वादग्रस्त ठरला. ती महिला ही भालगांवची होती. म्हणजे खेडकर यांच्याच गावांतील. पुढे भाजपाचे तालुकाध्यक्ष माणिक खेडकर यांनी खुलासा करणारा त्याच महिलेचा व्हिडीओ प्रसारीत केला नव्हता का ? पाथर्डीत ज्यावेळी भाजपाची बैठक झाली त्यावेळी विखे यांनी मोदी नाही तर मुंडेंकडे पाहून कमळाला मत द्या नाही तर तुतारी ठोका असे जे वादग्रस्त वक्तव्य केले. त्या बैठकीत विरोध करणारे हेच कार्यकर्ते नव्हते का ? पुढे निवडणूकीत विखेंचा पराभव झाला. कावळा उडायला फांदी तुटायला तशी एकच वेळ झाली. पण विखे पराभव सहजा सहजी स्वीकरत नाहीत. त्यात खेडकर यांनी उमेदवारी करून वंजारी व्होट बँकेला छेद दिला तेंव्हा हे प्रकरण इतक्या सहजा सहजी घडले नसावे.**

सबंध जोडणे उचित ठरणार नाही. त्यासंदर्भात पंकजा मुंडे यांनी जसा आरोपांचा खुलासा केला, तसा तो राधाकृष्ण विखेयांनी महसूलमंत्री म्हणून करायला हवाच. कारण या साऱ्या घडामोडी या महसूल खात्यांतर्गत असून तया खात्याचे ते प्रमुख आहेत.

हे प्रकरण इथेच संपत नाही. त्याची पुर्वपीठीका वेगळी दिसते. बधवंत साहेब अहमदनगर जिल्हा परिषदेत सीईओ असताना यशवंतराव गडाख, पुढे राजळे अध्यक्ष होते. पण बुधवंत यांना बाळासाहेब विखे यांचा अप्रत्यक्ष वरदहस्त असायचा हा इतिहास लक्षात घ्यावा लागेल. बुधवंत-खेडकर घराणी पूर्वी विखेंना समर्थन देणारी होती.

या लोकसभा निवडणूकीपूर्वी डॉ. सुजय विखे यांनी साखर तांदुळ वाटले. त्यावेळी भालगांवच्या एका वृध्द महिलेचा व्हिडीओ प्रसारीत झाला होता. त्यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली होती. त्यामागे भाजपाचे तालुकाध्यक्ष खेडकर होते. असा संशय घेतला गेला. हे खेडकर दिलीप खेडकर यांचे बंधू होते. पुढे दिलीप खेडकर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार झाले. त्यांनी वंजारी समाजाची मते मोठया प्रमाणावर घेतली. अर्थात ही व्होट बँक विखेंची होती. त्यालाच खडकरांनी काही प्रमाणात छेद दिलेजला असू शकतो. स्व. बाळासाहेब विखे यांनी बबनराव ढाकणे पुढे गोपीनाथ मुंडे यांच्या माध्यमातून वंजारी समाजाची जी व्होट बँक जपली होती. त्याला या निवडणूकीत दिलीप खेडकर यांनी उमेदवारी बहाल करून काही प्रमाणात छेद दिला. हा राजकीय दृष्टया रूचला नसावा ही शक्यता काही प्रमाणात गृहीत धरावी लागेल त्या अनुषंगानेच दिलीप खेडकर यांना हा राजकीय कटकारस्थानाचा भाग असल्याचा संशय व्यक्त केलेला आहे.

कदाचित कावळा उडायला आणि फांदी तुटायला एकच वेळ झालेली असू शकते. याचा दरम्यान डॉ. सुजय विखे यांनी कावळया बाबत जे वक्तव्य केले ते राजकीय वर्तुळात गाजत आहे. ही नाण्याची दुसरी बाजू विचारात घ्यायची का ? हा सुतावरून स्वर्ग गाठण्याचा प्रकार ठरू शकतो. पण पुजा खेडकर यांचे कारनामे ज्या झटपट पध्दतीने पुढे आले तो पुर्वनियोजित कटाचा भाग ठरू शकतो. तसेच मनोरमा खेडकर यांचे जुने प्रकरण उकरून अटक करणे आणि दिलीप खेडकर यांच्या जुन्या बाबी उजेडात आणून चौकशी लावणे कितपत संयुक्तीक ठरते. ते दोषी होते तर यापूर्वीच तास का झाला नव्हता ? आताच ही उपरती का ? म्हणजे पुजा खेडकर प्रकरण वरकरणी दिसते त्यापेक्षा वेगळे असून त्याला राजकीय वास असून त्यांची चौकशी होऊन दोषींवर कारवाई झाली पाहिजे.

# खा. लंके यांचे स्थानिक गुन्हे शाखेविरोधात सोमवारपासून उपोषण

शाखेतील हप्तेखोरीची तक्रार करूनही दखल नाही

नगर : प्रतिनिधी

**पोलीस दलातील स्थानिक गुन्हे शाखेतील भ्रष्टाचाराविरोधात दि. ११ जुलै रोजी मुख्यमंत्रयांसह इतरांकडे तक्रार करूनही त्याची दखल न घेतली गेल्याने खा. नीलेश लंके हे त्यांच्या सहका-यांसह सोमवार दि.२२ जुलै पासून पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर उपोषणास बसणार आहेत.**




खा. लंके यांनी यासंदर्भात गुरूवारी पोलीस अधिक्षकांना पत्र पाठविले आहे. या उपोषणासाठी लाउड स्पिकर तसेच मंडप लावण्यासंदर्भात परवानगी मागण्यात आली आहे. निवेदनात नमुद करण्यात आहे की, स्थानिक गुन्हे शाखेतील भ्रष्टाचाराबाबत दि.११ जुलै रोजी पत्रद्वारे अवगत करण्यात आले होते. परंतू त्याची अद्यापपर्यंत कुठलीही दखल घेतली गेली नाही, किंवा संबंधितांवर कोणतीही कठोर कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे आपण व आपले सहकारी पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर उपोषणास बसणार असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

या तक्रारीसंदर्भात खा. लंके यांनी ११ जुलै रोजी मुख्यमंत्रयांना पत्र पाठवून नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेतील भ्रष्टाचाराकडे लक्ष वेधले होते. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, उपनिरीक्षक सोपान गोरे व इरत कर्मचारी हे राजरोसपणे हप्ते घेत आहेत. हप्ते गोळा करण्याकामी रविंद्र आबासाहेब कर्डीले व त्यांचे सहकारी त्यांना मदत करत आहेत. रविंद्र कर्डीले यांची शिर्डी येथील साई मंदीर सुरक्षा विभागात नेमणूक असतानाही तात्पुरत्या स्वरूपात त्यांची सायबर सेल नगर येथे बदली करण्यात आली आहे.

स्थानिक गुन्हे शाखा व सायबर सेल या दोन्ही अस्थापना वेगवेगळया असून दोन्ही विभाग स्वतंत्र असताना या शाखांचा कार्यभार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्याकडे देण्यात आला आहे. आहेर यांच्याकडे दोन्ही शाचखेचा कार्यभार हा फक्त आर्थिक लोभापाई असल्याचा आरोप खा. लंके यांनी पत्रात केला आहे.

जिल्हयामध्ये बीफ मटन, ऑनलाईन क्लब, वाळू, गुटखा, दारू, गांजा, चंदनतस्करी हे व्यवसाय तसेच मटका, बिंगो हे व्यवसाय पोलीसांच्या आशिर्वाद आणि आश्रयाखाली सुरू मोठया प्रमाणावर सुरू आहे. या प्रकरणाचा मास्टर माईड रविंद्र कर्डीले असून त्यांच्यावर यापूर्वी स्थानिक गुन्हे शाखेत असताना लाचलुचपत अन्वेशन शाखेने कारवाई केलेली आहे. हा खटला जिल्हा न्यायालयात प्रलंबित आहे. नगर शहरातील एका गुन्हयामध्ये राज्य गुन्हे अन्वेशन शाखेमार्फत सुरू असल्याचेही या पत्राद्वारे निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

## पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या स्थगित ठेवा

**मागील वर्षी प्रामाणिक पोलीस कर्मचाऱ्यांवर मोठ्या प्रमाणावर अन्याय झालेला आहे. या बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे जोपर्यंत उपोषण स्थगित होत नाही, तोपर्यंत पोलीस कर्मचऱ्यांच्या बदल्या तात्पुरत्या स्थगित कराव्यात असेही खा. लंके यांनी पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या दुसऱ्या पत्रात सुचित केले आहे.**

# राज्य कबड्डी संघटनेच्या निवडणुकीत खा. नीलेश लंके मतदान करणार !

मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय


नगर : प्रतिनिधी

**राज्य कब्बडी संघटनेच्या निवडणुकीत खासदार नीलेश लंके तसेच सच्चिदानंद भोसले यांना मतदान करण्याचा अधिकार मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला.**



राज्य कबड्डी संघटनेच्या निवडणूकीसाठी अंतिम यादीतील बदल अहवाल वेळेत न दिल्याचे कारण देत मतदानासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पाठविण्यात आलेले अवैध ठरविल्याच्या निर्णयाविरोधात खा. नीलेश लंके व सच्चिदानंद भोसले यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाद धाव घेतली होती.

लंके व भोसले यांच्या याचिकेवर गुरूवारी सुनावणी झाली. त्यावर न्यायालयाने हा निर्णय दिला. राज्य कबड्डी संघटनेच्या निवडणूकीसाठी अहमदनगर जिल्हा संघटनेने मतदार म्हणून पाठविलेली खा. नीलेश लंके व सच्चिदानंद भोसले यांची नावे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पहिल्या यादीत अवैध ठरविली होती. या निर्णयाविरोधात म्हणणे मांडण्यासाठी ३ जुलै पर्यंत मुदत देण्यात आली होती. संघटनेच्या वतीने देण्यात आलेल्या मुदतीत सर्व अटींची पुर्तता करण्यात आली होती. त्यानंतरही खा. लंके, भोसले यांच्यासह इतर जिल्हयातील काही नावे अवैध ठरविण्यात आली होती. अवैध ठरविण्यात आलेल्यांमध्ये अरविंद सावंत रत्नागिरी, समीर थोरात सातारा, मनोज ठाकूर, वक्केश राऊत व माणिक वोतोंडे पालघर यांचाही समावेश होता.
खा. नीलेश लंके यांनी सांगितले की, नगर जिल्हयातून आपला व सच्छिदानंद भोसले यांचा दाखल करण्यात आलेला उर्वरीत पान ३ वर









# युवा

## लग्नाबद्दल टोमण्यांना असे द्या उत्तर... बोलती होईल बंद!

**जीवनातील सुख-दुःखाचे साथीदार म्हणून नातेवाईकांकडे पाहिले जाते. पण काही नातलग असे असतात जे तुम्हाला दुःखात पाहूनच आनंदी होतात. अशा नातेवाईकांपासून वेळीच दूर राहणे चांगले. असे लोक छोट्या-छोट्या समस्यांना इतके मोठे बनवतात की कधी कधी व्यक्तीला मानसिक त्रास होतो. विशेषतः लग्नाचा विषय असेल तर त्यांच्या तोंडावर ताबा ठेवणे अवघड होऊन जाते. तुम्हीही अशा परिस्थितीचा सामना करत असाल तर काही टिप्स तुमच्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकतात. या टिप्स अशा आहेत की तुम्ही अशा फटकळ लोकांचे तोंड कायमचे बंद करू शकता...**

- शक्य तितक्या गोष्टींकडे दुर्लक्ष करा : नातेवाईकांकडून



टोमणे टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्याकडे शक्य तितके दुर्लक्ष करणे. कारण प्रत्येक वेळी जेव्हा तुम्ही उत्तर द्याल तेव्हा ते तुम्हाला त्यांच्या टोमण्याने अधिक त्रास देतील. त्यांना नेमकं हेच हवं असतं की तुम्ही त्यांना उलट उत्तर द्यावं आणि मग तुम्हाला ते चांगलं सुनावू शकतील.
- प्रेमाने आपले मत मांडा : लग्न करायचं की नाही करायचं हा अत्यंत वैयक्तिक निर्णय आहे. हा निर्णय कधीही कोणाच्या प्रभावाखाली घेऊ नये. म्हणून, जेव्हा जेव्हा कोणी नातेवाईक तुम्हाला याबद्दल टोमणा मारतात किंवा लग्नासाठी तुमच्यावर विविध मार्गांनी दबाव आणतात तेव्हा त्यांना शांत राहून तुमची बाजू समजावून सांगण्याचा प्रयत्न करा.
- नातेवाईकांना त्यांच्या मर्यादा सांगा : प्रत्येक नात्याला स्वतःच्या मर्यादा असतात. त्यामुळे नात्यात प्रेम टिकवून ठेवण्यासाठी एकमेकांचा आदर करणे खूप गरजेचे असते. अशा परिस्थितीत, जर एखाद्या नातेवाईकाने याची काळजी घेतली नाही, तर तुम्ही त्यांना तुमच्या जीवनाबद्दल बोलण्याचा अधिकार त्यांना का नाही हे स्पष्ट शब्दात सांगा.
- समर्पक उत्तर देणे सुद्धा आवश्यक : वारंवार समजावूनही तुमचे नातेवाईक तुम्हाला टोमणे मारणे थांबवत नसतील तर तुम्ही त्यांना चोख प्रत्युत्तर दिले पाहिजे. कारण असे लोक तुमची काळजी करत नाहीत तर तुम्हाला काळजीत पडलेले पाहून आनंदी होतात. म्हणून, जेव्हा असे नातलग तुम्हाला भेटील तेव्हा ते नक्कीच काहीतरी बोलतील. ज्यामुळे तुमचा मूड खराब होईल, अशावेळी त्यांना आवर्जून उत्तर द्या.
- परिस्थिती सांगा : काही लोक आर्थिक परिस्थिती किंवा करिअरसाठी लग्न उशिरा करतात. पण अशिक्षित, करिअर आणि पैशांचं महत्त्व माहीत नसणाऱ्या लोकांना याची किंमत माहीत नसते. त्यांना लग्न आणि संसार हेच फक्त महत्त्वाचं वाटतं. अशावेळी त्यांना तुमच्या आयुष्यातील ते ध्येय उघडपणे आणि गर्वाने सांगा की ते पूर्ण होईपर्यंत पुन्हा त्यांनी लग्नाचा विषय सुद्धा तुमच्यासमोर काढला नाही पाहिजे.

## DINK COUPLES ही काय भानगड?




**योग्य वयात लग्न आणि मुलं व्हावीत हे आजही आपल्याकडे मानले जाते. पती आणि पत्नीच्या आरोग्यासाठी हे महत्त्वाचे ठरते. मात्र सध्या बऱ्याच गोष्टी बदलल्या आहेत. आता अनेकदा वयाला नाही तर करिअर आणि पैशाला महत्त्व दिले जाते. मुला-मुलींचे लग्न हे नक्कीच योग्य वयात व्हावे असे घरातील अनेकांना वाटत असले तरीही सध्याची तरूण पिढी हे जास्त फॉलो करताना दिसून येत नाही. शहरांमध्ये जेव्हा मुलं- मुली लग्नाचा विचार करतात तेव्हा ते करिअरमध्ये सेटल झालेले असतात. बरेचदा योग्य वयात लग्न तर करतात, मात्र मुलांचा विचार करत नाहीत. मुलांना जन्म देण्यासाठी अजिबात घाई करत नाहीत. अनेकदा आपली स्वप्नं पूर्ण करण्याचा विचार कपल्स करताना दिसतात. यात आपले घर, कार आणि करिअरमध्ये प्रमोशन या गोष्टीचा विचार जास्त होताना दिसतो. त्यामुळेच DINK Couple ट्रेंड वाढताना दिसून आहे. याचा नेमका अर्थ काय आहे आणि जोडीदारांना मिळणारे फायदे नुकसान काय असू शकतात याबाबत जाणून घेऊया...**

- काय आहे DINK कपल्स ट्रेंड : DINK कपल्स म्हणजे ज्यांचे लग्न झाले आहे, जे नोकरी करत आहेत अथवा व्यवसाय करत आहेत आणि त्यांचा लग्नानंतर फॅमिली प्लॅनिंगचा कोणताही विचार नाही. त्यांच्यासाठी DINK या शब्दाचा वापर केला जातो, ज्याचा फुल फॉर्म आहे Dual Income No Kids. दोघेही काम करत असतात, मात्र त्यांना पालक होण्याची अजिबात घाई नसते.
- मुलांची इच्छा नाही : कपल्स असा एक निर्णय घेतात ज्यामध्ये त्यांना मुलांचे कोणतेही टेन्शन नको असते. आपण जे काही कमावत आहोत, ते आपल्या स्वतःवर खर्च करणे, सेव्हिंग करणे याला महत्त्व देण्यात येते. गेल्या काही वर्षांमध्ये हा ट्रेंड वाढत चालला आहे आणि अनेक कपल्स हा निर्णय घेताना दिसून येत आहेत. मुलांची जबाबदारी न घेता आपल्या स्वतःसाठी जगण्याला प्राधान्य देणाऱ्या कपल्सना DINK असं म्हणतात.
- DINK कपल्सचे फायदे : वास्तविकतः DINK कपल्स हे समाजाच्या विचारापेक्षाही स्वतःला प्राधान्य देणे अधिक महत्त्वाचे समजतात. अशा व्यक्ती अशी कामं करतात ज्यामधून त्यांना आनंद मिळेल आणि कुटुंबापेक्षा स्वतःला आणि आपल्या आनंदाला हे कपल्स अधिक प्राधान्य देतात. यामध्ये काही नुकसान नक्कीच आहे पण फायदेही आहेत. अशा कपल्सना अधिक दर्जात्मक वेळ एकमेकांना देता येतो. तसंच एकमेकांना समजून घेण्यासाठी अधिक वेळ मिळतो. मुलांच्या भविष्यापेक्षा स्वतःकडे लक्ष देता येते. दोघांचीच साथ असल्याने लक्ष भरकटत नाही.
- काय आहे आव्हान : समाजातील काही व्यक्तींना नक्कीच ही लाइफस्टाईल योग्य वाटत नाही. विशेषतः जुन्या जमान्यातील व्यक्तींना. आई-वडील ज्यांना वाटतं की आपल्या मुलांनी लवकरात लवकर आई-वडील होण्याचा निर्णय घ्यावा, त्यांना अजिबात हे आवडत नाही. अशा कपल्सना स्वार्थी म्हटलं जातं. डिंक कपल्सचा पर्याय अशा मुली निवडतात ज्यांना कुटुंबाला प्राधान्य द्यायचं आहे. मात्र त्यांना व्यक्तीगत आयुष्यातही करिअरमध्ये पुढे जायचं आहे.
- काय सांगतात तज्ञ... : डॉक्टरांच्या मते, अनेकदा कपल्सचे असे विचार हे कुटुंब आणि समजापासून दूर जातात. त्यामुळे त्यांच्यामध्ये अधिक तणाव येतो. अशावेळी स्वतःचा आनंद जोपासताना बाकी ठिकाणी मात्र ताणतणाव अधिक जाणवू लागतो आणि त्यामुळे डॉक्टरांची मदत घ्यावी लागते. वास्तविक मेंटल हेल्थ एक्स्पर्ट्सजवळ सामाजिक दबाव कसा मॅनेज करावा, कुटुंबाशी अलागाव असणे कसे मॅनेज करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. मानसिक आरोग्याशी संबंधित त्रास स्वीकारावा आणि ते ठीक करावे याचेही मार्गदर्शन करण्यात येते.




## सावट रुममेट सिंड्रोमचे!



**जेव्हा दोन लोक लग्न करतात आणि आयुष्यभर एकत्र राहण्याचे वचन देतात तेव्हा त्यांच्यासमोर एकमेकांच्या गरजा पूर्ण करण्याचे आव्हान असते. आयुष्यात एकमेकांना समजून घेणे गरजेचे आहे. पण या प्रकारात असे होत नाही. कालांतराने अशी परिस्थिती उद्भवते जेव्हा एखाद्या व्यक्तीला जीवनाच्या धावपळीत थकवा जाणवू लागतो आणि याचा परिणाम नातेसंबंधावर होऊ लागतो. अशा परिस्थितीत ते एका छताखाली जोडपी एखाद्या रूममेट्ससारखे जीवन जगू लागतात. अशा परिस्थितीत व्यक्तीला एकटे वाटू लागते...**

- रुममेट सिंड्रोमचे तोटे : लग्नात रूममेट सिंड्रोम असल्याने कुटुंबात भांडणे, वाद, मुलांचे संगोपन करताना समस्या, मुलांसोबतचे खराब संबंध, एकटेपणा, मानसिक ताणतणाव यासारख्या समस्या उद्भवतात. डिस्कनेक्शन नैराश्य येऊ शकते. कोणतेही नाते टिकवण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. त्यामुळे नातं तयार झाल्यावर ती टिकून ठेवण्यासाठी मनापासून प्रयत्न करा.
- एकमेकांचे चांगुलपणा लक्षात ठेवा : जेव्हा जेव्हा तुम्हाला रूममेट सिंड्रोमची लक्षणे दिसतात तेव्हा तुमच्या जोडीदारातील वाईट गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी त्याच्यात चांगले काय आहे हे लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करा. लक्षात ठेवा जबाबदाऱ्यांमुळे तुमच्यामध्ये अंतर असू शकते. परंतु तुमच्यामध्ये सर्व काही चांगले होईल.
- त्यांना स्पेशल फील करा : अनेक वेळा तुमच्या पार्टनरला असे वाटू लागते की तुम्हाला त्याच्याबद्दल काही खास भावना नाही. अशा परिस्थितीत छोट्या छोट्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करा. यामध्ये छोट्या गोष्टी आहेत त्यात तुमच्या जोडीदाराचा आवडता पिझ्झा घेऊन येतो किंवा तुमचा आवडता ड्रेस खरेदी करतो. त्यांच्या हसण्याचे कारण बना.
- जीवनात बदल आवश्यक : जीवन निराशाजनक आणि कंटाळवाणे होत आहे असे वाटत असेल तर बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करा. यासाठी तुम्ही तुमच्या रुटीनमध्ये बदल करू शकता, तुमच्या रुटीनमध्ये चालणे आदीचा समावेश करू शकता. एकत्र चित्रपटाचा प्लॅन करू शकता किंवा काहीतरी मजेदार करू शकता.
- क्वालिटी टाइम : एकमेकांसोबत क्वालिटी टाइम घालवणे ही गोष्ट देखील खूप महत्त्वाची आहे. उदाहरणार्थ, काहीवेळा जर तुमच्या जोडीदाराला ऑफिसमधून यायचे असेल तर त्याला रिसीव्ह करा, कधी एकत्र जेवण बनवा आणि काही चांगल्या गोष्टी एकत्र शेअर करा. या गोष्टीमुळे तुमचे नातं घट्ट होण्यास मदत होईल.

## तपासा या ५ गोष्टी...सुखी होईल संसार!



**आयुष्यात अशा अनेक गोष्टी असतात ज्यासाठी आपण लगेच हो म्हणतो, पण लग्नाला लगेच हो म्हणत नाही. त्याआधी तुमच्या जोडीदाराशी बसून काही मुद्द्यांवर चर्चा करणे महत्त्वाचे आहे. येथे आम्ही तुम्हाला अशाच काही महत्त्वाच्या गोष्टींबद्दल सांगत आहोत. लग्न ठरवताना पैशाबद्दल चर्चा करणे चांगले मानले जात नाही, परंतु इथेच आपण चुकतो. आपण भावनिक गोष्टींसोबतच व्यावहारिक गोष्टींवर देखील लक्ष दिले पाहिजे आणि त्याबद्दलची मते आपल्या पार्टनरकडून लग्नाआधीच जाणून घेतली पाहिजेत. एक लक्षात ठेवा की, पैसा खूप महत्वाचा आहे. लग्नानंतर या विषयावर बोलून नात्यात कटुता निर्माण करण्यापेक्षा लग्नाआधी या विषयावर मनमोकळेपणाने आणि अर्थपूर्ण संवाद साधलेला बरा. तुमचा खर्च आणि बचत करण्याच्या सवयी किती समान आहेत हे तुम्हाला दोघांनाही माहीत असणे महत्त्वाचे आहे. जर तुम्ही आता लग्नाच्या प्रोसेसमध्ये असाल आणि पार्टनर शोधत असलं तर अशा काही गोष्टी आहेत ज्या तुम्ही आधीच विचारलेल्या बऱ्या!**

- मुलाची जबाबदारी हवी की नको? : आता परिस्थिती पूर्वीसारखी राहिलेली नाही. पूर्वी लग्नाच्या वर्षभरानंतर मूल झालं तर पती- पत्नी आनंदात असायची. पण आजकाल कपल्स लवकर ही जबाबदारी घेण्यास टाळाटाळ करतात. उलट लग्नाआधीच ठरवतात की त्यांना लगेच मूल हवे आहे का? जर होय, तर किती वर्षांनी? तुम्ही तुमच्या लाईफ पार्टनरशी याविषयी बोलले पाहिजे, जेणेकरून उद्या कौटुंबिक दबाव आला तर या मुद्द्यावर तुमच्या दोघांमध्ये भांडण होणार नाही. मुलांबाबत तुमच्यामध्ये जे काही ठरलं असेल ते गरज भासल्यास तुमच्या कुटुंबियांना सुद्धा सांगा.
- आई- वडिलांसोबत राहायचे की नाही? : लग्नाआधी तुम्ही हे सुनिश्चित केले पाहिजे की तुम्ही दोघे आई-वडिलांसोबत राहणार आहात की एकटे? यामुळे तुम्ही दोघेही मानसिकदृष्ट्या तयार व्हाल. लग्नानंतर तुम्ही आई-वडिलांसोबत राहत नसलात तरी आई-वडिलांना आर्थिक पाठबळ देण्याची जबाबदारी तुमची आहे का? यावरही चर्चा व्हायला हवी.
- तुमचे करिअर गोल काय असेल? : अनेक नोकरी करणाऱ्या मुली लग्नानंतर नोकरी सोडतात. तुम्ही तुमच्या जोडीदाराशी बोलले पाहिजे की तुम्हाला दुसऱ्या शहरात किंवा देशात चांगली नोकरी मिळाली तर तिलाही अथवा त्यालाही तुमच्यासोबत यायला आवडेल का? की तुम्ही दोघेही दोन वेगवेगळ्या शहरात राहून करियर कराल?
- वाईट स्थिती आली तर काय? : आजकाल वाईट स्थिती काही सांगून येत नाही. एक चुकीचा निर्णय आणि होत्याचं नव्हतं होऊन बसतं. खास करून आर्थिक बाबतीत फटका बसू शकतो. अशावेळेस जर आता चांगली असणारी स्थिती नंतर वाईट झाली तर जोडीदार सपोर्ट करेल की वेगळा निर्णय घेईल यावर सुद्धा एकमेकांशी मनमोकळेपणाने बोललं पाहिजे.
- एखादे स्वप्न अन् मैत्री... : कधी कधी नात्यात असताना नवरा किंवा बायको एकमेकांबाबत खूप पझेसिव्ह असतात. अशावेळी त्यांच्या आयुष्यात फार मित्र-मैत्रीण असलेले खपत नाही आणि मग भांडणे वाढतात. जास्त वेळ मित्र-मैत्रीणींसोबत व्यतीत करणे, सतत त्यांची आठवण काढणे, न सांगता पैसे देणे या सर्व गोष्टी पार्टनरला अजिबात सहन न होणाऱ्या असतात. त्यामुळे त्यावर आधीच चर्चा झालेली बरी..! याव्यतिरिक्त तुमचं असं एखादं स्वप्न जे पार्टनरच्या घराण्याला शोभणारं नसेल किंवा त्याला आवडणारं नसेल तर त्याला आधीच गोड बोलून त्यासाठी तयार करा, जेणेकरून नंतरचे वाद टळतील.



## जोडीदारासोबत पहिलाच प्रवास... मग हे जपाच!



**आता सर्वत्र लग्नाचे वारे वाहू लागले आहेत. असे असताना लग्ननंतरची महत्त्वाची गोष्ट म्हणजे हनिमून किंवा पहिला प्रवास, बाहेर गेल्यावर माणूस उलगडू लागतो. पण जोडीदारासोबत प्रवास करताना काही गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे. जेव्हा तुम्ही नवीन नात्यात किंवा वैवाहिक जीवनात असता तेव्हा उत्साह खूप जास्त असतो. या काळात जोडप्याला त्यांच्या आयुष्यातील सर्वोत्तम क्षण घालवायचे असतात. म्हणूनच ते प्रवास किंवा हनिमूनचे प्लॅन करतात. यावेळी हे क्षण कायमचे संस्मरणीय बनवण्याचा प्रयत्न केला जातो. पण या काळात अनेकवेळा जोडप्यांकडून अशा चुका होतात ज्यामुळे गोष्टी बिघडतात. त्यानंतर फक्त टेन्शन घेण्याशिवाय कोणत्याच गोष्टी राहत नाही. जर तुम्ही तुमच्या लव्ह पार्टनरसोबत पहिल्यांदाच प्रवास करत असाल तर काही गोष्टी करणं नक्की टाळा यामुळे तुमचे नातं घट्ट होण्यास मदत होते...**

- जास्त फोटो काढू नका : पहिल्यांदा एकत्र प्रवास करत असताना या जोडप्याला या आठवणी कायम जपून ठेवण्याची इच्छा असते. ते जास्तीत जास्त छायाचित्रे काढण्याचा प्रयत्न करतात. आम्ही असे म्हणत नाही की फोटो क्लिक करू नका, परंतु केवळ यावर लक्ष केंद्रित करू नका. तुम्ही आठवणी तुमच्या मनात साठवून ठेवा. यामुळे तुमचे नातं घट्ट होण्यास मदत होईल.
- विनाकारण प्रभावित करण्याचा प्रयत्न करू नका : प्रत्येक व्यक्तीला आपण चांगले असावे असे वाटते. पण हनिमून दरम्यान एकमेकांसमोर चांगले वागायचे असते किंवा त्यांना विशेष वाटावे असा प्रयत्न करतात, परंतु असे करणे तुमच्या जोडीदाराला खोटे वाटू शकते. जर तुम्ही असे वागलात तर एक दिवशी सत्य बाहेर येईल. त्यामुळे नॅचरल राहण्याचा प्रयत्न करा.
- प्रवासात जोडीदाराच्या आवडीची काळजी घ्या : प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनिवडी वेगवेगळ्या असतात, काही लोकांना डोंगर आवडतात तर काहींना समुद्रावर वेळ घालवायला आवडतो. जर तुमच्या दोघांची प्रवासाची आवड वेगळी असेल तर एकमेकांची काळजी घ्या. दोघांच्या आवडी-निवडी जुळतील अशा ठिकाणी जाण्याचा प्रयत्न करा, अन्यथा कोणीही सहलीचा आनंद घेणार नाही.
- फक्त हॉटेलमध्येच वेळ घालवू नका : अनेक वेळा जोडपी अशी आलिशान हॉटेल्स बुक करतात आणि त्यांच्याकडे लक्झरी रूम, स्विमिंग पूल, स्पा, जिम अशा अनेक सुविधा असतात. ज्यामुळे त्यांना रूम आणि हॉटेल सोडावेसे वाटत नाही, पण तुम्ही नक्कीच बाहेर जाऊन निसर्ग पाहा. बाहेर गेल्यावर तुम्ही एकमेकांना समजू शकता. यामुळे तुमचे नाते घट्ट होण्यास मदत होईल.

## शॉर्ट न्यूज

### भंडारदरा पाणलोट क्षेत्रात पावसाची विश्रांती

**भंडारदरा :** धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने विश्रांती घेतली आहे. भंडारदरा धरणस्थळी गेल्या ३६ तासांत अवघ्या तीन मिलिमीटर पावसाची नोंद झाली. यामुळे धरणात होणाऱ्या नवीन पाण्याची आवकही मंदावली आहे. गेल्या दोन दिवसांपासून भंडारदरा पाणलोट क्षेत्रातील घाटघर रतनवाडी आदी परिसरात पावसाचे प्रमाण अत्यल्प झाले आहे. असे असले तरी दररोज आभाळ भरून येत असल्यामुळे - पावसाची शक्यता दिसून येत आहे.

### तिसगावमध्ये भीषण पाणी टंचाई

**पाथर्डी :** तालुक्यातील तिसगाव येथे भीषण पाणी टंचाई असून जुलैमहिना सुरू झाला असून परिसरामध्ये मोठा पाऊस न झाल्यामुळे तिसगाव ग्रामस्थांना पिण्याचे पाण्याचा सामना करावा लागत आहे. मागणी करूनही नियमितपणे पाणीपुरवठा होत नसल्यामुळे डीपीआयचे जिल्हाध्यक्ष सुरेश शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली तिसगाव ग्रामपंचायतवर महिलांचा हंडा मोर्चा काढणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

### पोषण आहार कर्मचाऱ्यांची बैठक

**शेवगाव :** शालेय पोषण आहार योजनेतील कर्मचाऱ्यांच्या समस्या शासन स्तरावर २० वर्षापासून प्रलंबित आहे. या घटकाला न्याय मिळवून बण्यासाठी सम्यक फाउंडेशन प्रणित श्रमिक मजूर संघ शालेय पोषण आहार कर्मचारी संघटना राज्य पातळीवर कार्यरत असून त्यांची तालुका बैठक नुकतीच शेवगाव येथे झाली. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष महेंद्र विधाते होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संघटनेचे राज्य समन्वयक सुभाष सोनवणे आणि उत्तम गायकवाड, तालुकाध्यक्षा शिवकन्या गिरम उपस्थित होते.

### पती-पत्नीला बेदम मारहाण

**संगमनेर :** पती-पत्नीला लाकडी दांड्याने मारहाण केल्याची घटना संगमनेर शहरातील दिल्ली नाका येथे घडली. याप्रकरणी शहर पोलिसांत दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे हिवरगाव पावसा येथील पोपट पांडू साळुंके व गोरख पांडू साळुंके यांनी शोभा अशोक साळुंके यांच्यासह पती अशोक नारायण साळुंके यांना मागील भांडणाच्या कारणावरून बोलावून घेत दिल्ली नाका येथे पोपट साळुंके याने लाकडी दांड्याने अशोक साळुंके यांना बेदम मारहाण केली तर गोरख पांडू साळुंके याने पत्र्यावर ढकलून दिल्याने दुखापत झाली. शोभा साळुंके यांनाही पोपट साळुंके याने मारहाण केली.

### बालविवाह प्रकरणी पाचजणांविरुद्ध गुन्हा

**लोणी :** येथील एका रुग्णालयात बाळंतपणासाठी गेलेल्या विवाहितेचे वय कमी असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आल्यानंतर मुलीच्या जबाबावरून घारगाव पोलिसांनी संगमनेर तालुक्यातील रहिवासी असणाऱ्या मुलीच्या नवऱ्यासह सासू-सासऱ्यांवर व पीडित मुलीच्या आई-वडिलांवर बलात्कार, बालविवाह प्रतिबंध आणि पोस्को कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. दीड वर्षापूर्वी लग्न झालेली मुलगी गरोदर राहिली. तिला लोणी येथे रुग्णालयात बाळंतपणासाठी दाखल केले असता सदर मुलगी ही अल्पवयीन असल्याचे आणि तिचे लग्न करण्यात आले असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले.

### बसस्थानकाच्या कामाची आ. तनपुरेंकडून पाहणी

**राहुरी :** बसस्थानकाच्या नवीन इमारतीचे काम सुरू झाले असून या कामाची पाहणी आ. प्राजक्त तनपुरे यांनी केली. बसस्थानक नाविन्यपूर्ण असावे, यासाठी परिवहन महामंडळ व राज्य सरकार यांच्यात योग्य समन्वय राखत बैठका घेऊन प्रश्न निकाली काढण्यासाठी मोठे परिश्रम घेतले होते. सुमारे १७ कोटी रुपये मंजूर झाले असून त्यातील पावणे चार कोटी रुपयांचे काम हाती घेतले. सध्या तात्पुरत्या स्वरूपात पत्र्याचे शेड उभारण्यात आले असून विद्यार्थ्यांच्या पाससाठी शेडमध्ये स्वतंत्र दालन करावे, अशा सुचना आ. तनपुरे यांनी ठेकेदारांना दिल्या.

# दरोड्याच्या तयारीतील पाच आरोपी गजाआड

## राहुरी पोलिसांची कामगिरी



**राहुरी : प्रतिनिधी**

**तालुक्यातील गुहा गावाच्या परिसरात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच दरोडेखोरांना राहुरी पोलिसांनी मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. या टोळीतील दोन आरोपी पसार झाले आहेत. त्यांचा शोध पोलीस पथक घेत आहे. सुखदेव रामदास खिलदकर (वय ३०), साहिल सिकंदर सय्यद (वय २५, दोघे रा. नांदूर, ता. आष्टी, जि. बीड), अरुण बाळासाहेब बर्डे (वय २२), सोमनाथ रामदास गायकवाड (वय २७) व शक्तिमान रामदास गायकवाड (तिघे रा. कुरणवाडी, ता. राहुरी, जि. नगर) अशी जेरबंद आरोपींची नावे आहेत.**

राहुरी पोलीस नेहमीप्रमाणे रात्री गस्त घालत असताना त्यांना माहिती मिळाली की, एक चारचाकी व एक दुचाकीवर काही जण गुहा परिसरात दरोडा घालण्यासाठी टेहळणी करत आहेत. त्यानुसार राहुरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक संजय ठेंगे यांनी पथके रवाना केली. राहुरी पोलिसांच्या पथकांनी छापा टाकला असता चारचाकी वाहनातील चार जण ताब्यात घेण्यात आले. तर एका दुचाकीवर बसून तीन जणांनी पसार होण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार एका पथकाने या दुचाकीचा पाठलाग केला. दुचाकी वेगात चालविण्याच्या प्रयत्नात दुचाकी चालक आरोपीचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे दुचाकीवरील तीनही आरोपी खाली पडले. त्यातील दोन आरोपी अंधाराचा फायदा घेत पसार झाले. मात्र, त्यातील शक्तिमान गायकवाड हा जखमी झाला. त्याला पळता न आल्याने पोलिसांनी त्याला लगेच ताब्यात घेतले. बाळू लहानू गायकवाड व नवनाथ तुकाराम पवार अशी पसार आरोपींची नावे आहेत. त्यांचा शोध पथक घेत आहे.

पथकाने जेरबंद आरोपींकडून धारदार शस्त्र, दोऱ्या, स्क्रू ड्रायव्हर, वेगवेगळे पान्हे, केबल कटर, लोखंडी कत्ती, लाइटर असे साहित्य हस्तगत केले. जेरबंद पाच आरोपींपैकी चार आरोपी सराईत गुन्हेगार आहेत. या पैकी सुखदेव खिलदकरवर यापूर्वी दोन, अरुण बर्डे वर दोन, सोमनाथ गायकवाडवर दोन तर शक्तिमान गायकवाडवर यापूर्वी एक गुन्हा दाखल आहे. राहुरी पोलिसांनी टोळीतील सातही आरोपींविरोधात अवैध शस्त्र बाळगणे व दरोड्याच्या तयारीचा गुन्हा दाखल केला आहे.

# हिवरेबाजार ग्रामस्थांनी स्मृतिदिन न ठेवता कृतीतून उतरवला

## उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन

**हिवरेबाजार : प्रतिनिधी**

**आईचा स्मृतिदिन स्मारक स्वरुपात न ठेवता हिवरेबाजारकरांनी आरोग्य शिबिराद्वारे प्रत्यक्ष कृतीतून उतरवला. पद्मश्री पोपटराव पवार व हिवरे बाजार ग्रामस्थांच्या संकल्पनेचे मी स्वागत करतो, असे प्रतिपादन उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी केले.**



आदर्श गाव हिवरे बाजार येथे पद्मश्री पोपटराव पवार यांच्या मातोश्री जानकाबाई पवार यांच्या १७ व्या स्मृतीदिनानिमित्त हिवरे बाजार आणि परिसरातील ग्रामस्थांसाठी पद्मश्री पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हिवरे बाजार ग्रामपंचायत, यशवंत कृषी ग्राम व पाणलोट विकास संस्था हिवरे बाजार व संचेती ऑर्थपेडीक रिहॅबीटीलेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बीएमडी तपासणी, शरीरातील अस्थींचे वस्तुमान योग्य आहे कि नाही, तसेच हाडांचे आजार तपासणी व त्यावरील उपचार आणि व्यायाम(फिजीओथेरपी) शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पद्मश्री पोपटराव पवार हे होते. कार्यक्रमाला उद्योजक राजेंद्र शिंदे, याप्रसंगी उद्योजक राजेंद्र शिंदे, डॉ.वृषभ देवगडे ,डॉ. अपूर्वा गांधी,डॉ. प्रचिती दुग्गड,डॉ. प्रीती पवार, जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता गाडळकर,ॲड. संतोष गायकवाड,सरपंच विमल ठाणगे उपस्थित होते.

संचेती हॉस्पिटलचे डॉ.भूषण पाटील यांनी हाडांचे आजार आणि उपचार व बीएमडी तपासणी याविषयी महत्त्व सांगितले. या शिबिरात १३० जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यापूर्वी कै.जानकाबाई पवार यांच्या स्मृतीदिनानिमित्त वेगवेगळ्या प्रकारचे आरोग्याशी निगडीत जे आजार आहेत त्यांचे तपासणी व उपचार, तसेच डोळे तपासणी, दातांचे आजार व उपचार याविषयी आरोग्य शिबीर आयोजित केले होते. भविष्यात मोठे आरोग्य शिबीर आयोजित करण्याचा मानस आहे, असे पद्मश्री पवार यांनी सांगितले.

आरोग्य शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ.योगेश पवार ,समाधान कोंढणकर ,प्रसन्न पवार, प्रयास टीमने परिश्रम घेतले. आदर्श गाव हिवरेबाजार येथे सर्वरोग शिबीरात बोलताना पद्मश्री पोपटराव पवार. समवेत उद्योजक नरेंद्र फिरोदिया, राजेंद्र शिंदे.

**उद्योजक राजेंद्र शिंदे यांनी उलगडला खडतर जीवनप्रवास**

घरची परिस्थिती जेमतेम असल्याने हिंगणगाव येथे शिक्षणासाठी पायी जायचो. दहावीनंतर त्यांनी केडगाव येथे डीसीए हा संगणक कोर्स केला. तेथूनच मला कोडिंगची, एक्सेल शीट तयार करण्याची सवय लागली. यातून डोमेन, अकाउंटंट, प्रोजेक्टचे प्रेझेंटेशनचा अनुभव आला. त्यातून शासकीय प्रकल्प कोडींगची, बिलांची कामे मिळत गेली. वडिलांनी माझ्यावर विश्वास ठेवला नसता व त्यांनी संगणक घेऊन दिला नसता, तर मी आज काहीच नसतो, असा खडतर जीवन प्रवास गावातून घडलेला कार्यकर्ता ते सॉफ्टवेअर कंपनीचे मालक उद्योजक राजेंद्र शिंदे यांनी यावेळी उलगडला .

# गुळुंजवाडीत भीषण अपघात : तीन जण चिरडले; अपघातात १० ते १२ जण जखमी

**बेल्हे : प्रतिनिधी**

**कल्याण-नगर महामार्गावरील गुळुंचवाडी येथे भीषण अपघाताची घटना घडली आहे. भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकने अनेकांना चिरडल्याची माहिती समोर आली आहे. अंत्यविधी करून माघारी परतणाऱ्या अनेक नागरिकांना ट्रकने चिरडल्याची माहिती समोर आली आहे. या भीषण अपघाताततीन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये एक महिला, एक पुरुष आणि एक लहान मुलाचा समावेश आहे. तर १० ते १२ जण गंभीर जखमी असल्याची माहिती समोर आली आहे.**



जखमींना उपचारांसाठी जवळच्या खाजगी रुग्णालयात करण्यात आले आहे. अंत्यविधी उरकून नागरिक माघारी फिरले असताना भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला असल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातात३ ते ४ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या आधिक माहितीनुसार,आळेफाटा पोलीस स्टेशन हद्दीत आज (ता.१९ ) सकाळी ११.१५ वाजण्याच्या सुमारस मौजे गुळुंचवाडी या ठिकाणी अपघाताची घटना घडली आहे. गावातील मयत भांबीरे यांचा अंत्यविधी करून गावातील अनेक नागरीक आणि नातेवाईक कल्याण-नगर रोडने जात असताना नगर-कल्याण रोडने नगर बाजूकडून बेल्हे बाजूकडे येणाऱ्या १२ टायर ट्रकने रोडवरून पायी चालणाऱ्यांना चिरडलं. त्यामध्ये १ महिला, १ पुरुष, १ लहान मुलगा या तिघांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर गावात शोकाकुल वातावरण निर्माण झाले आहे.

कल्याण-अहमदनगरमहामार्गावर हा भीषण अपघात झाला. भरधाव वेगात आलेल्या अवजड ट्रकने अनेकांना चिरडलं आहे. यामध्ये तिघांचा जागीच मृत्यू झाला तर १० ते १२ जण गंभीर जखमी झाले. चालकाने बेदरकारपणे गाडी चालवत आधी दुचाकीस्वारांना चिरडलं त्यानंतर अंत्यसंस्कार विधी पुर्ण करून घरी परतणाऱ्या नागरिकांना चिरडलं. त्याचबरोबर चारचाकी वाहनांना देखील धडक दिली आहे. यामुळं जुन्नर तालुक्यातील गुळुंचवाडी गावावर शोककळा पसरली आहे. मृतांमध्ये १ पुरुष, १ महिला आणि एका लहान मुलाचा समावेश आहे. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. साडे अकराच्या सुमारास हा अपघातझाला आहे. घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ गावकऱ्यांनी बराच वेळ महामार्ग रोखून धरला होता. या ठिकाणी बायपास करावा या मागणीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यानं ही घटना घडल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

(पान १ वरून)

### राज्य कबड्डी संघटनेच्या निवडणुकीत खा. नीलेश लंके मतदान करणार !

अर्ज बाद करण्यामागे मोठे षडयंत्र आहे. स्पोर्टस कोड २०११ आणि दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नामांकन करताना धर्मदाय आयुक्त यांचे रेकॉर्ड सादर करण्याचे बंधन नाही. स्पोर्टस कोडनुसार अध्यक्ष आणि सचिव यांनी पाठविलेली नावे ग्राहय धरली जातात. जेंव्हा प्रतिनिधी नामांकन करतात कार्यकारणी ठराव महत्वपूर्ण असतो. त्यात बदल अर्ज एक वर्षातत कधीही दाखल केला जाऊ शकतो.ही एक औपचारीकता असते, कायदा नाही. कार्यकारणी किंवा सर्वसाधारण सभेचा ठराव महत्वाचा असतो. आमच्या संघटनेची निवडणूक २०२२ मध्ये झाली असताना आम्ही बदल अर्ज कसा केलेला नसेल ? असा सवाल खा. लंके यांनी केला.




# वाचकांच्या लेखणीतून

## ड्रोनच्या घिरट्या



निघोज, मोरवाडी, ढवणवाडी, वडनेर खु (पारनेर तालुका), वडनेर बु, माळवाडी, भाकरेवाडी, टाकळी हाजी (शिरूर तालुका), श्रीगोंदा तालुका या परिसरात रात्रीच्या वेळेस अवकाशात ड्रोन घिरट्या घालताना येथील रहिवाशांनी पाहिले असल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे. येथील लोकांनी सरकार दरबारी तशा तक्रारीही केल्या आहेत. महाराष्ट्र सरकारमधील विद्यमान मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि नामदार दिलीप वळसे पाटील यांनी संबंधित सरकारी खात्यांना याबाबत योग्य कारवाई करण्याचे आदेशही दिले आहेत म्हणे. ड्रोनच्या घिरट्यांचा सवाल विधानसभेतही मांडण्यात आला आहे, असेही कळते. तरीही लोकांच्या तक्रारी ऐकू येतच आहेत! जवळ जवळ वर्षभराचा कालावधी होत येईल तरीही याबाबत काहीही ठोस कारवाई झाल्याचे दिसत नाही. हे अती झाले!

एका तळ्याकाठी रस्ता होता. त्या रस्त्याने जाणाऱ्या एका वाटसरूला तळ्यातील पाण्याच्या पृष्ठभागावर टेंगळासारखे काही तरी तरंगताना दिसले! तो उत्सुकतेने ते काय असावे, म्हणून थबकून न्याहाळीत होता. दुसरा वाटसरूही हा मनुष्य काय पाहत आहे म्हणून तोही तेथेच थबकला. मग तिसरा आला. चौथा आला. खूप गर्दी जमली. जो तो एकमेकाला काय झाले म्हणून विचारीत होता. इतक्यात एक राजकीय पुढाऱ्याची कार बाजूने चालली होती. तीही एकदम थांबली. पुढारी गाडीतून खाली उतरले. गर्दीतल्या लोकांजवळ त्यांनी विचारणा केली. उत्तर ऐकून ते पुढारी गर्दीला उद्देशून म्हणाले, अहो त्यात काय एवढं? पाण्यावर तरंगणारं ते टेंगूळ नका समजू. उडाला तर पक्षी; बुडाला तर बेडूक समजा! चला आपापली वाट धरा. गर्दी पांगली; पण मूळ प्रश्न तरंगतच राहिला!

नामदार विखे पाटील आणि नामदार वळसे पाटील हे जुनेजाणते आणि अनुभवी मंत्री आहेत. ते या दृष्टान्तातल्या पुढाऱ्यांत गणना व्हावी असे नेते नाहीत. येथील रहिवासी जनता त्यांना आदर्श नेते मानते. सदर मंत्रिमहोदयांनी शासनाच्या माध्यमातून हा प्रश्न त्वरित धसास लावावा. जास्त विलंब लावू नये. ड्रोनच्या घिरट्यांचा छडा लावावा. रहिवासी जनतेची भीती दूर करावी.

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# जातनिहाय जनगणना करा

## भाकपचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**नगर : प्रतिनिधी**

**जातनिहाय जनगणना करावी व आरक्षणाची ५० टक्के मर्यादा उठवावी, या मागणीसाठी आज भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयसमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. आंदोलकांनी भाजप सरकार विरोधात घोषणा देऊन जाती-जातीमध्ये भांडणे लावण्याचे काम केले जात असल्याचा आरोप करुन निषेध व्यक्त केला.**

या आंदोलनात भाकपचे राज्य सेक्रेटरी ॲड. सुभाष लांडे, जिल्हा सचिव ॲड. बन्सी सातपुते, जनरल सेक्रेटरी ॲड. सुधीर टोकेकर, भैरवनाथ वाकळे, संदीप इथापे, फिरोज शेख, रामभाऊ लांडे आदी सहभागी झाले होते. कम्युनिस्ट पक्षाच्या विजयवाडा येथे झालेल्या त्रैवार्षिक महाअधिवेशनात जातनिहाय जनगणना करण्यासंदर्भात चर्चा होऊन ठराव मंजूर झालेला होता.

याशिवाय कम्युनिस्ट पक्षाने राज्यसभेत देखील २०१७ साली जातनिहाय जनगणना करावी,आहे यासाठी खासगी विधेयक मांडलेले होते. विविध राज्यांमध्ये यासाठी जनजागृती करण्यात आली. महाराष्ट्रातही भारतीय कम्युनिस्ट पक्षाशी संलग्नित असलेल्या अखिल भारतीय दलित अधिकार आंदोलनातर्फे राज्यव्यापी जातनिहाय जनगणना परिषद छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आली होती.



# वडझिरे येथे आर ओ प्लॅन्टचे लोकार्पण

## गावाला मिळणार शुध्द पाणी




■ वडझिरे येथे पंधराव्या वित्त आयोगातून उभारण्यात आलेल्या आर ओ प्लॅन्टचे ज्येष्ठ नागरीक शंकरराव लंके यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

**वडझिरे : प्रतिनिधी**

**तेराव्या वित्त आयोगातून वडझिरे येथे बसविण्यात आलेल्याआर ओ प्लॅन्टचे ज्येष्ठ नागरीक शंकरराव लंके यांच्या हस्ते आषाढी एकादशीचे औचित्य साधून लोकार्पण करण्यात आले.**

या प्लॅन्टच्या माध्यमातून संपूर्ण वडझिरे गावाला पिण्याच्या शुध्द पाण्याचा पुरवठा होणार आहे. लोकार्पण समारंभास सरपंच नीलेश केदारे, सदस्य बाळासाहेब सपकाळ, सहाययक पोलीस निरीक्षक शंकर चौधरी, सामाजिक कार्यकर्ते विजय एरंडे, सेवा संस्थेचे चेअरमन किसन गंधाक्ते, उद्योजक अमोलशेठ मोरे, ग्रामसेवक संजय गवळी, आनंदाशेठ चौधरी, युवराज मोरे, रामचंद्र विश्वास, सुभाष सुरुडे, संजय केदारे, वाळुंज सर, गोटू चौधरी, ठेकेदार प्रदीप नरसाळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना युवा नेते अनिल गंधाक्ते म्हणाले,

### खा. लंके यांच्या आदर्शावर वाटचाल

**खा. नीलेश लंके यांच्या आदर्शावर वाटचाल करीत वडझिरे गावाचा सर्वांगिण विकास करण्याचे वडझिरे गावातील पदाधिकाऱ्यांचे ध्येय आहे. खा. लंके तसेच राणीताई लंके यांच्या माध्यमातून विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येत असून आगामी काळात वडझिरे गावाचा आदर्श तालुक्यापुढे ठेवण्याचे ध्येय आहे.**

**अनिल गंधाक्ते**
**ग्रामपंचायत सदस्य, वडझिरे**

वडझिरे गावाच्या सर्वांगिण विकासासाठी खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ग्रामपंचायत सदस्य एकदिलाने काम करत असून प्रत्येक प्रभागात आवष्यक ती विकास कामे करण्यावर भर देण्यात येत आहे. आरोग्याची काळजी घेण्यासाठी पंधराव्या वित्त आयोगातून आर ओ प्लॅन्टची उभारणी करण्यात आली असून आता सर्व नागरीकांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे. राज्य तसेच केंद्र शासनाच्या विविध योजना गावामध्ये राबवून विकासाचा अनुशेष भरून काढण्याचा निर्धार सर्व पदाधिकाऱ्यांनी केला असून त्यास खासदार नीलेश लंके, जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई लंके यांचे बहुमोल सहकार्य लाभत असल्याचे गंधाक्ते यांनी कृतज्ञतापुर्वक नमुद केले.

# बदलत्या हवामानावरील समस्या थोपविण्यासाठी एकत्रीत प्रयत्नांची गरज

## पद्मश्री पोपटराव पवार यांचे प्रतिपादन

**हिवरे बाजार : प्रतिनिधी**

**बदलते हवामान व त्यामुळे शेती व इतर घटकांवर होणारे परिणाम यातून निर्माण होणा-या समस्या थांबविण्यासाठी राज्यकर्ते, प्रशासन आणि सामान्य जनता यांना एकरूप होउन काम करावे लागेल असे प्रतिपादन आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांनी केले.**

ओरीसाच्या शिक्षा आणि अनुसंधान विद्यापीठाच्या वतीने जागतिक स्तरावरील सरस्टनेबल ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट उईथ क्लायमेट स्मार्ट सिस्टमस या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. जगभरातील पाणी, पर्यावरण तसेच शेती क्षेत्रात काम करणारे तज्ञ मान्यवर यावेळी उपस्थित होते. चर्चासत्राच्या उद्घाटनासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री कनकवर्धनसिंग देव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून पद्मश्री पोपटराव पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अमेरिकेच्या नेब्रास्का वॉटर सेंटरचे प्रमुख चित्तरंजन रे, विद्यापीठाचे कुलगुरू प्रदीप्त कुमार नंदा हे यावेळी उपस्थित होते.यावेळी पद्मश्री पोपटराव पवार यांनी हिवरेबाजार ग्रामविकासाचे उभे केलेले मॉडेल तसेच मृद व जलसंधारणात केलेल्या शास्वत कामांची माहीती दिली.

पद्मश्री पवार यांच्या भाषणानंतर उपमुख्यमंत्री कनकवर्धन सिंग देव यांनी त्यांच्या भाषणात पवार यांचे कार्य व त्यांच्यासारखी माणसं आमचे आदर्श असल्याचे गौरवोद्गार काढेल. त्यांच्या सारख्या माणसांची संख्या वाढली पाहिजे अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या चर्चासत्रामध्ये वातावरणातील बदल, सतत होणारी अनिश्चितता आणि त्यावरील उपाययोजना, त्यांची अंमलबजावणी तसेच पर्यावरणाला अनुसरून शास्वत शेती आणि इतर शेतीनिष्ठ उपजीविकांची निर्मिती या विषयावर चर्चा करण्यात आली. वातावरणातील होणाऱ्या बदलांच्या पार्श्वभुमीवर पर्यावरणाला अनुसारून पाण्याच्या स्त्रोतांचे व्यवस्थापन आदी विषयांवरील समस्या व त्याचे निराकारण यावरही चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी राहुरी कृषि विद्यापीठाचे मृद व जलसंधारण अभियांत्रीकी विभागाचे प्रमुख डॉ. सचिन नंदगुडे, तसेच प्रसन्न पवार हे उपस्थित होते.



■ सरस्टनेबल ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट उईथ क्लायमेट स्मार्ट सिस्टमस या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात पद्मश्री पोपटराव पवार यांनी मार्गदर्शन केले.

# श्री संत सेना भक्त निवासासाठी तीन लाखांचा निधी

## नाभिक वाघमारे कुटूंबाचे दायित्व



**सुपा : प्रतिनिधी**

**श्री.क्षेत्र पिंपळनेर येथील श्री संत सेना महाराज मंदिर जिर्णोद्धार सुरु असून तमाम नाभिक बांधवांच्या स्वनिधीतुन मंदिर बांधकाम पुर्णत्वास आले आहे तसेच सभामंडप तत्कालीन कै.खासदार दिलीप गांधी, आणि नवनिर्वाचित खासदार नीलेश लंके यांचे आमदार निधीतून प्रशस्त सभामंडप कंपाऊंड असे विविध निधीतून, एक सभामंडप नाभिक समाजाच्या वर्गणीतून, बाळासाहेब भुजबळ यांनी स्वतः मंदिराचे कळसाचे बांधकाम करून दिले आणि पुण्यतिथीच्या आधी मंदीराचे तिनही भिंतीला ते स्टाईल फरशी बसवुन देणार आहेत. अशी विविध कामे पुर्ण झाली आहेत.**

यासाठी नाभिक बांधवांचे सर्व पदाधिकारी यांचे अथक प्रयत्न सुरुच आहेत. सध्या कंपाऊंडचे काम सुरु आहे. सर्वांच्या अथक परिश्रमाने आणि श्री संत सेना महाराज यांचे आशिर्वादाने आपण श्री क्षेत्र पिंपळनेर भूमित संत सेना महाराजांचे मंदिर स्थापनेपासून प्रयत्नात असल्याने सिध्दीस जात आहे.

मंदिर आणि सभामंडप पुर्ण झाला असून आता आगामी काळातील सर्वांनी एक संकल्प केला आहे आणि तो म्हणजे श्री संत सेना महाराज भक्तनिवास यासाठी मोठ्या निधीची गरज आहे. आणि त्यासाठीची सुरुवातही झाली. वाडेगव्हाण येथील नाभिक कुटूंब वाघमारे यांनी मूहूर्तमेढ रोवली आहे. हि सामाजिक तसेच मोठी भूषनावह गोष्ठ आहे. दोन सभामंडप मिळून १५०० स्केवर फूट स्लॅब वर भव्य श्री संत सेना भवन उभारण्याचे आयोजन असल्याने याकरीता विविध माध्यमातून निधी उपलब्ध होत आहे. नुकताच वाडेगव्हाण येथील सुरेश प्रल्हाद वाघमारे यांनी तीन लक्ष निधीचा धनादेश जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, तालुकाध्यक्ष भाऊ बिडे यांचेकडे सुपूर्त केला.

यावेळी सुरेशराव प्रल्हाद वाघमारे व पत्नी सौ रंजना सुरेशराव वाघमारे, योगेश सुरेशराव वाघमारे, सौ संगीता योगेश वाघमारे, निलेश सुरेशराव वाघमारे, सौ. कीर्ती निलेश वाघमारे, तनुश्री वाघमारे,श्रावणी वाघमारे, बाळासाहेब भुजबळ जिल्हाध्यक्ष अहमदनगर, बापूसाहेब औटी जिल्हा सचिव अहमदनगर, रमेश बिडवे मधुकरराव घायतडक करडे मेजर, भाऊसाहेब सोनवणे, रमेश प्रल्हाद वाघमारे, शामराव जाधव उपाध्यक्ष अहमदनगर, भाऊसाहेब बिडे तालुका अध्यक्ष पारनेर, शामराव साळुंके उपाध्यक्ष पारनेर, सुनिल आतकर सचिव पारनेर, संजय वाकचौरे सदस्य मेजर, प्रसाद दत्तात्रय भोसले सहसचिव, प्रमोद सोनवणे सदस्य, विनायक कुटे, रामेश्वर घायतडक, मच्छिंद्र वाघमारे, योगेश सोनवणे, अनिल वाघमारे, कुटे, आदिनाथ बांगर आदी यावेळी उपस्थित होते.

# विद्याधाम मुलींचा संघ ब्रिटानिया चषकाचा मानकरी

## लोणी व्यंकनाथ संघाला उपविजेतेपद



**सुपा : प्रतिनिधी**

**श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेच्या मुलींच्या क्रिकेट संघाने विजेतेपद मिळवत ब्रिटानिया चषक पटकावला.**
**पद्मभूषण वसंतदादा पाटील विद्यालय पिंप्री कोलंदर येथील मैदानावर ब्रिटानिया न्युट्रीशन फाऊंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त ब्रिटानिया चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे उद्घाटन ब्रिटानिया कंपनीचे वरीष्ठ पदाधिकारी डॉ. प्रशांत आरोरा, डॉ. राकेश कुमार, निखिल रोडे, मुख्याध्यापक बाळासाहेब जठार यांच्या शुभहस्ते झाले.**

देवदैठण, लोणी, उक्कडगाव, पिंपळगाव पिसा व पिंप्री कोलंदर अशा सहा संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अंतिम सामना देवदैठण विरुद्ध लोणी व्यंकनाथ यांच्यामध्ये झाला. या सामन्यात देवदैठण संघाकडून कर्णधार साक्षी बनकर, समिक्षा वाळुंज, नागेश्वरी वाघमारे, दिव्या शिंदे, श्रावणी कांडेकर, रुचिरा कौठाळे, स्वराली मोटे, साक्षी शेळके, दिव्या शेळके, सायली वाघमारे, समीक्षा घेगडे, अक्षदा शिंदे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत एकतर्फी विजय मिळवला. या संघाला क्रीडा शिक्षक संदीप घावटे यांचे मार्गदर्शन लाभले.

मुलींना खेळण्यासाठी व्यासपीठ मिळावे , त्यांच्यात जिद्द ,धाडस निर्माण व्हावे यासाठी या स्पर्धांचे आयोजन केले होते. देवदैठणच्या उपसरपंच प्रियंका बनकर व युवानेते अनिल बनकर यांनी विजेत्या संघातील खेळाडू मुलींना रायटिंग पॅड बक्षीस म्हणून दिले.

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव नंदकुमार निकम, शाळा समिती अध्यक्ष चंदुलाल चोरडिया, प्राचार्य विशाल डोके, पर्यवेक्षक नामदेव डुंबरे व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# पारनेर तालुका भाजप उद्योग आघाडीच्या अध्यक्षपदी सचिन शेळके

## एमआयडीसीमधील अडचणी सोडविण्याची ग्वाही



**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुका भाजप उद्योग आघाडीच्या अध्यक्षपदी वाडेगव्हाण येथील सचिन शेळके यांची नुकतीच निवड करण्यात आली.प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे, भाजप तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांच्या हस्ते शेळके यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.**

यावेळी जिल्हा महिला भाजप अध्यक्ष अश्विनी थोरात, मा. जिल्हा परिषद सदस्य सचिन वराळ, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुनील थोरात, मा. जिल्हा अध्यक्ष भाजपा सुभाष दुधाडे, मा. पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर, युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष सागर मैड, नगरसेवक पारनेर युवराज पठारे, सरपंच तथा कामगार आघाडी तालुकाध्यक्ष मनोज मुंगसे, युवा मोर्चा पारनेर तालुका अध्यक्ष पंकज कारखिले, टाकळी ढोकेश्वरचे माजी सरपंच शिवाजी खिलारी, नगरसेवक पारनेर अशोक चेडे, पारनेर शहर अध्यक्ष भाजपा ऋषी गंधाडे, पारनेर कोषागार अध्यक्ष किरण कोकाटे आदी यावेळी उपस्थित होते.

पक्षश्रेष्ठी, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, भाजप तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा जाऊ न देता पक्ष संघटना वाढीसाठी प्रयत्न करणार असून सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योग क्षेत्रात येणाऱ्या अडचणी समजून घेणार व त्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष सचिन शेळके यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# वाडेगव्हाणमध्ये घडले सामाजिक एकात्मतेचे दर्शन!

## आषाढी एकादशी व मोहरम मिरवणूक समोरासमोरच



**वाडेगव्हाण : प्रतिनिधी**

**आषाढी एकादशी व मोहरम एकाच दिवशी साजरी करण्यात आल्याने गावोगाव दिंडी व मोहरम मिरवणुक निघाल्या.गावामध्ये दिंडी व मिरवणूक समोरासमोर आल्यानंतर एकत्र येत मुस्लिम बांधवानी भजन गात सामाजिक एकात्मतेचे दर्शन दिले.**

वाडेगव्हाण(ता.पारनेर)येथे आषाढी एकादशीनिमित्त गावातील भाविकांनी दिंडी काढत विठ्ठल रखुमाई मंदिरात जाण्यासाठी टाळ मृदंग सह मिरवणूक काढली याचबरोबर गावातील मुस्लिम बांधवांनी मोहरम निमित्त मशिदीतून मिरवणूक काढली.दिंडी व मोहरम मिरवणुक गावातील मुख्य चौकात समोरासमोर आल्यानंतर मुस्लिम बांधवांनी दिंडीत सहभागी होत.भजन किर्तन गात मोठ्या भक्तिभावाने हा धार्मिक कार्यक्रम पार पाडला सोशल मिडीयावर याबाबतची पोस्ट ग्रामस्थांनी केल्यानंतर त्यावर विविध परीसरातील नागरिकांनी सामाजिक एकात्मतेचे संदेश त्यावर दिले.
या मिरवणूकीत शहाजी शेळके, राजेंद्र शेळके, महामुद शेख, रमजान शेख, इन्युस शेख, जयराम रासकर,वसंत वाघमारे,सातपुते बाबा,बापुराव रासकर,समीर शेख, शौकत शेख, कादर शेख, ईस्माईल शेख, शमशुद्दीन शेख, कलिंदर शेख, वसंत रासकर,अण्णा विटकर, विक्की पुंड, बाबुराव सोनवणे, मार्तंड झांबरे, दादामियाँ शेख, रशीद शेख, इसाक शेख,बशीर शेख, दिलावर शेख,येदूनाथ झांबरे उपस्थित होते.

### ग्रामीण भागात वेगळाच आदर्श

**आजकाल सोशल मीडियावरील विविध माध्यमातून दोन समाजामध्ये तेढ निर्माण केला जातो मात्र ग्रामीण भागातील गावांमध्ये अजुनही सर्व जाती धर्मातील लोक गुण्यागोविंदाने राहतात आजही दिंडी व मिरवणूक समोरासमोर आल्यानंतर सर्वांनी एकत्र येत भजन गात विठुनामाचा गजर करत सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडविले.**

**प्रियंका यादव**
**सरपंच वाडेगव्हाण**

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंचे काम समाजाभिमुख

## ■ सचिन पाटील वराळ यांचे प्रतिपादन
## ■ पुण्यतिथीनिमित्त निघोज ग्रामपंचायतीत अभिवादन



**निघोज : प्रतिनिधी**

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी साहित्याच्या माध्यमातून समाजाचा विकास केला असून समाजाभिमुख नेतृत्व करून राज्याचा नावलौकिक देशात केला असल्याचे प्रतिपादन संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी व्यक्त केले आहे.**

निघोज ग्रामपंचायत कार्यालयात मातंग एकता आंदोलन निघोज व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय प्रतिष्ठान निघोज यांच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस वराळ पाटील, पत्रकार सचिन जाधव, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे पदाधिकारी बाळासाहेब साळवे, आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवि रणसिंग यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमास लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे मुख्य पदाधिकारी सतिष साळवे, सुलतान सय्यद, ठेकेदार मनोज लामखडे, संतोष साळवे, संजय साळवे, प्रकाश साळवे, कैलास साळवे, स्वप्नील साळवे, गोरक्ष साळवे, वैभव साळवे, अर्जुन वैरागर, अशोक साळवे, अरुण साळवे, रविंद्र साळवे, विकी साळवे, अनिकेत अवचिते, दत्ता आपटे, राहुल साळवे, शुभम साळवे, साहिल कसबे, कुणाल कसबे, प्रतिक आल्हाट, यश साळवे आदी उपस्थित होते.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे मुख्य पदाधिकारी सतिष साळवे यावेळी म्हणाले आजचे पुढारी आरक्षण मुद्यावर जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने धोकादायक असून जातीय सलोखा राहिला पाहिजे यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे योगदान सर्वाधिक आहे. त्यांची मुल्ये जपण्याचे काम आजच्या राज्यकर्त्यांनी करणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.पण या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्लमभाई इनामदार यांनी केले यावेळी अर्जुन वैरागर यांनी आभार मानले.

# मळगंगा चरणी सुभेदार निरंजन कुमार नतमस्तक

## देवीदर्शनाचा योग हे भाग्यच असल्याची भावना

**निघोज : प्रतिनिधी**

**नागपूर येथे स्थायिक असलेले सुभेदार निरंजन कुमार मुलकर व त्यांच्या कुटुंबीयांनी गुरुवारी मळगंगा देवीचे दर्शन घेतले. मुलकर हे सैन्यदलात देशातील अनेक राज्यात कार्यरत राहून देशसेवा केली आहे.**

निघोज येथील मेजर संतोष वरखडे यांनी मुलकर यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली काम केले असून मळगंगा देवीचा अगाध महिमा माहिती झाल्यानंतर सुभेदार मुलकर आणि कुटुंबियांनी देवीचे दर्शन व आशिर्वाद घेण्यासाठी निघोजला येण्याची इच्छा व्यक्त केली त्याप्रमाणे ते गुरुवारी रोजी आले होते.
यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद यांच्या हस्ते सुभेदार मुलकर यांचा शाल श्रीफळ व देवीचा फोटो देऊन सत्कार करुण सन्मानित करण्यात आले. यावेळी ट्रस्टचे विश्वस्त बबनराव ससाणे, सल्लागार कमिटी सदस्य रुपेश ढवण, मेजर संतोष वरखडे, पुजारी सुनिल गायखे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे



कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे आदी तसेच सुभेदार मुलकर यांचे कुटुंबीय उपस्थित होते.
यावेळी सुभेदार मुलकर यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला दोन हजार रुपये देणगी दिली. मुलकर यांनी यानंतर जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात जाऊन कुंड माऊली मळगंगा देवीचे दर्शन घेतले तसेच जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसराची पाहणी केली. यावेळी ते म्हणाले राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचा दर्शनाचा योग कुटुंबासहीत आला हे माझे भाग्य समजतो.

देशात अनेक राज्यात सैन्य दलात सेवा करण्याची संधी मला मिळाली. मात्र जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरातील नैसर्गिक रांजणखळगे हा पर्यटन स्थळ पाहून आपण आश्चर्यचकीत झालो आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विकास होण्याची गरज आहे. जगप्रसिद्ध रांजणखळगे हा राज्याला मिळालेला अनमोल ठेवा असून त्याचे जतन करण्याचे काम गावकरी व ट्रस्ट यांनी केले आहे. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त बबनराव ससाणे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा ट्रस्ट सल्लागार सदस्य रुपेश ढवण यांनी आभार मानले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com